# महाराष्ट्र शासन
# सार्वजनिक आरोग्य विभाग
# कंत्राटी वैद्यकिय अधिकारी गट-अ यांची पदभरती जिल्हा परिषद सातारा

| Walk In Interview | |
|---|---|
| १ | जिल्हा परिषद सातारा अधिनस्त प्राथमिक आरोग्य केंद्र येथे कंत्राटी वैद्यकीय अधिकारी यांची Walk In Interview द्वारे पदे भरावयाची आहेत. तरी सदर पदाकरीता एम.बी.बी.एस./बी.ए.एम.एस. उमेदवार Walk In Interview करिता प्रत्येक महिन्याच्या पहिल्या व चौथ्या सोमवारी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा येथे मूळ कागदपत्रे तसेच मूळ कागदपत्रांच्या छायांकित प्रतीची एक प्रत घेऊन उपस्थित राहणेचे आहे. सदर दिवशी सकाळी १०:३० ते १२:३० वा. पर्यंत उमदवारांचे अर्ज स्विकारले जातील. तसेच त्याच दिवशी दु. ०४:०० वा. उमेदवारांचे समुपदेशन प्रकिया घेण्यात येईल. सदर भरतीकरीता अटी व शर्ती जिल्हा परिषदेच्या www.zpsatara.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.<br><br>Jitendra<br>जिल्हाधिकारी<br>सातारा |

# कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी च्या अटी व शर्ती खालीप्रमाणे

<u>अटी व शर्ती –</u>

१. कंत्राटी वैद्यकिय अधिकारी हे शासकीय नियमीत कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही फायदे मिळण्यास पात्र असणार नाहीत.

२. रिक्त पदांची संख्या लक्षात घेऊन पदव्युत्तर अर्हता धारकांना प्राधान्य देण्यात येईल.

३. कंत्राटी वैद्यकिय अधिकाऱ्यांची सेवा खालील कारणास्तव समाधानकारक नसल्यास कोणत्याही क्षणी त्यांची कंत्राटी सेवा पूर्वसूचना न देता समाप्त करण्यात येईल.

i) दोन दिवसांपेक्षा जास्त कालावधीसाठी विनापरवानगी गैरहजर.
ii) कामामध्ये निष्काळजीपणा.
iii) बायोमेट्रीक प्रणालीवर हजेरी न लावणे.
iv) कामकाज अकार्यक्षम असणे/सेवेची कर्तव्य व जबाबदाऱ्या कटाक्षाने न पाळल्यास.
v) गैरवर्तन/गैरव्यवहार केल्याचे निदर्शनास येणे.
vi) कार्यरत पदावर नियमित वैद्यकिय अधिकाऱ्यांची नियुक्ती झाल्यास.

४. ज्या रिक्त ठिकाणी एम.बी.बी.ए.एस उमेदवार उपलब्ध होणार नाहीत. त्याठिकाणी बी.ए.एम.एस धारक यांचा देखील नियुक्तीसाठी विचार केला जाईल. परंतु याठिकाणी एम.बी.बी.एस. उमेदवार उपलब्ध झाल्यास बी.ए.एम.एस धारकांची सदरील नियुक्ती रद्द करण्यात येईल.

५. अर्ज करणाऱ्या उमेदवारांचे वय ५८ वर्षापेक्षा जास्त नसावे.

६. निवड झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांनी नियुक्तीच्या मुख्यालयी राहणे बंधनकारक असेल तसेच बायोमेट्रीक हजेरी प्रणालीवर हजेरी लावणे अनिवार्य राहील.

७. निवड झालेले वैद्यकिय अधिकारी १ महिन्यांची पूर्व सूचना देऊन कार्यमुक्त होऊ शकतील.

८. खालील कारणास्तव कार्यमुक्त झालेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांना पुन्हा नियुक्ती मिळणार नाही.

i) कंत्राटी म्हणून नियुक्ती मिळाल्यानंतर नियुक्तीचा कालावधी पूर्ण होण्यापूर्वी परवानगी न घेता गैरहजर असलेले व कंत्राटी सेवा सोडून गेलेले वैद्यकिय अधिकारी.
ii) शासन सेवेत ५८ वर्षे सेवा पूर्ण करुन सेवानिवृत्त झालेले वैद्यकिय अधिकारी.

iii) शिस्तभंगाच्या कारणास्तव सेवा समाप्त केलेले वैद्यकिय अधिकारी.

iv) अनधिकृत गैरहजर असलेले व शासन सेवेतून काढून टाकलेले व संपामध्ये भाग घेतलेले वैद्यकिय अधिकारी.

९. नियमित वैद्यकिय अधिकारी उपलब्ध झाल्यानंतर कंत्राटी पध्दतीवर नियुक्ती केलेल्या वैद्यकिय अधिकाऱ्यांची सेवा समाप्त करताना जो वैद्यकिय अधिकारी त्याठिकाणी शेवटी रुजु झालेला आहे त्यांची सेवा प्रथम समाप्त करण्यात येईल व इतर ठिकाणी रिक्त पद असलेस त्याठिकाणी नियुक्ती देणेबाबत प्राधान्य दिले जाईल.

१०. वैद्यकिय अधिकाऱ्यांकडून त्यांची नियुक्ती कंत्राटी स्वरुपाची असल्यामुळे सदर पदावर कायम करण्याबाबत भविष्यात अधिकार सांगणार नाही व त्यासाठी तसेच अन्य मागण्यांसाठी आंदोलन/ संप/बंद इत्यादी करणार नाही व त्यात भाग घेणार नाही अशा आशयाचे बंधपत्र रु. १००/- च्या स्टॅम्प पेपरवर घेण्यात यावे.

११. या सेवा कंत्राटी पध्दतीच्या असल्याने त्याबाबत कोणत्याही न्यायालयात जाता येणार नाही.

१२. शासन सेवा शर्तीखाली ही सेवा नसल्याने त्या अनुषंगाने मिळणारे निवृत्तीवेतन, विमा योजना, भविष्य निर्वाह निधी अथवा तत्सम कोणत्याही प्रकारचे लाभ मिळण्यास पात्र राहणार नाहीत.

१३. वरील पदासाठी अर्ज सोबतच्या नमुन्याप्रमाणे लिहून पासपोर्ट साईज फोटो चिकटवून सोबत शैक्षणिक अर्हता, गुणपत्रिका व प्रमाणपत्रांसह (पदवी/पदविका,पासिंग व अटेम्ट) जात पडताळणी प्रमाणपत्र, वयाचा दाखला (शाळा सोडल्याचा दाखला), मोबाईल क्रमांक, आधार दाखला, महाराष्ट्र मेडिकल कौन्सिल रजिस्ट्रेशन, नुतनीकरण,एमएससीआयटी इत्यादी प्रमाणत्राच्या साक्षांकित प्रती जोडुन अर्ज सादर करणे आवश्यक आहे.

१४. प्रस्तुत अटी व शर्तीमध्ये वेळोवेळी बदल करणेचे अधिकार मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सातारा यांचेकडे राहतील.

१५. कंत्राटी वैद्यकीय अधिकारी पदासाठी जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद सातारा यांचे कार्यालयात अर्ज सादर करावेत.

१६. सध्या दर्शविण्यात आलेली रिक्त पदे याव्यतिरिक्त यापुढे रिक्त होणारी पदे अथवा गैरहजर वैद्यकिय अधिकारी यानुसार आवश्यकतेप्रमाणे मुलाखतीद्वारे रिक्त पदे भरण्यात येतील. तसेच जहिरातीमध्ये दर्शविण्यात आलेल्या रिक्त पदांमध्ये मुलाखतीमध्ये बदल होऊ शकतो.

१७. सार्वजनिक आरोग्य विभाग शासन निर्णय क्रं.मवैअ-१०५४/प्र.क्रं.२४१/सेवा-३ दिनांक ०२ मार्च २०१५ चे अनुषंगाने यानंतर प्रत्येक महिन्याच्या चौथ्या सोमवारी रिक्त पदे भरण्यात येतील त्यासाठी आरोग्य विभाग, जिल्हा परिषद सातारा येथे उपस्थित रहावे व यापुढे रिक्त होणाऱ्या पदांसाठी वेळोवेळी वृत्तपत्रात जाहिरात प्रसिध्द करण्यात येणार नाही. तसेच जाहिरात प्रसिध्द झालेपासून पदे पूर्ण भरेपर्यंत सदर जाहिरात ग्राह्य धरण्यात येतील याची नोंद घ्यावी.

जिल्हाधिकारी
सातारा

टीपः- सदर भरती प्रक्रियेबाबत कोणत्याही प्रकारची तक्रार निर्माण झाल्यास त्याबाबतचे तक्रार निवारण अधिकारी मा. जिल्हाधिकारी सातारा हे राहतील.